NUTA BULLETIN

OFFICIAL JOURNAL OF NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION

Regd. No. MAHBIL/2001/4448 : Postal Registration No. AMT/RNP/78/2024-2026

YEAR : 49) 1st January 2024 ( No. of Pages 08 ) ( No : 02

# राज्यामध्ये समूह विद्यापीठ स्थापन करण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वे निश्चित करणे

## महाराष्ट्र शासन : उच्च व तंत्र शिक्षण विभाग

शासन निर्णय क्रमांक : संकिर्ण-२०२३/प्र.क्र.११२/विशि-३मंत्रालय, मुंबई-४०००३२

**दिनांक : २९ नोव्हेंबर, २०२३**

### प्रस्तावना

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० हे शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्यासाठी, आंतरविद्याशाखीय अभ्यासक्रमांना चालना देण्यासाठी, शैक्षणिक संस्थांमधील सहयोग सुलभ करण्यासाठी नाविन्यपूर्ण प्रशासन संरचनेची क्षमता व फायदे ओळखून **विद्यमान संलग्नता प्रणाली टप्प्या-टप्प्याने कमी करून नाविन्यपूर्ण बहुविद्याशाखीय शिक्षणाद्वारे विद्यार्थ्यांना शैक्षणिक लवचिकता प्रदान करीत आहे.**

२. विद्यापीठ अनुदान आयोगाने सप्टेंबर, २०२२ मध्ये उच्च शिक्षण संस्थांचे बहुविद्याशाखीय संस्थांमध्ये रूपांतरित करण्याबाबतची मार्गदर्शक तत्त्वे निर्गमित केली आहेत **या मार्गदर्शक तत्त्वाचे अनुपालन करण्याचा एक मार्ग हा महाविद्यालयांचे समूह तयार करणे आहे.**

३. राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान (RUSA) या अंतर्गतही विद्यमान उच्च-कार्यक्षम शैक्षणिक संस्थांचे समूह विद्यापीठांमध्ये रूपांतर करण्यास प्रोत्साहन देण्यात आले आहे. **त्यानुसार याअंतर्गत राज्यात तीन समूह विद्यापीठे कार्यरत आहेत.** (डॉ.होमी भाभा राज्य विद्यापीठ, मुंबई, हैद्राबाद सिंध नॅशनल कॉलिजिएट विद्यापीठ, मुंबई आणि कर्मवारी भाऊराव पाटील विद्यापीठ, सातारा)

४. शैक्षणिक क्षेत्रामध्ये बहुविद्याशाखीयता, सहयोग आणि नवकल्पना वाढवण्याच्या दृष्टीकोनातून शासनाने राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान (RUSA) २.० द्वारे प्रदान केलेल्या मार्गदर्शक तत्त्वांचे तपशीलवार विचार करून आणि महाराष्ट्रातील **तीन क्लस्टर विद्यापीठांच्या अंमलबजावणीतून मिळालेल्या अनुभवातून समूह विद्यापीठांच्या स्थापनेसंदर्भात धोरण ठरविण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वे विहित करीत आहे.**

५. या आराखड्याच्या केंद्रस्थानी प्रमुख महाविद्यालयाची संकल्पना आहे. प्रमुख महाविद्यालय हे शैक्षणिक दृष्ट्या उच्च कामगिरी करणारे, आवश्यक ती पायाभूत सुविधा, प्रशिक्षित आणि समूह विद्यापीठाच्या क्रियाकलापांचे मार्गदर्शन आणि समन्वय करण्यासाठी सक्षम असणारे महाविद्यालय/संस्था असेल जे समूह विद्यापीठातील घटक महाविद्यालये/संस्थांना सामायिक दृष्टीकोनातून शैक्षणिक उत्कृष्टता आणि सर्वांगीण विकासासाठी मार्गदर्शन करेल, समन्वयक म्हणून काम करेल, **आवश्यक संसाधने एकत्रित करून क्षमता वाढवेल आणि कर्मचाऱ्यांचा व्यावसायिक दृष्टीकोनाचा विकास ठरेल.**

६. या मार्गदर्शक तत्त्वांनुसार **प्रस्तावित समूह विद्यापीठांतर्गत सर्व महाविद्यालयांनी समन्वय, सहयोग आणि सर्वांगीण विकासावर भर देऊन एकसंध शिक्षण प्रणालीमध्ये विलीन होणे अभिप्रेत आहे.** या महत्त्वपूर्ण परिवर्तनाचा एक भाग म्हणून, एक एकीकृत नेतृत्व दृष्टीकोन वाढवण्याच्या अनुषंगाने **समूह विद्यापीठांतर्गत महाविद्यालयांच्या प्राचार्यांना त्यांच्या पदांच्या प्रशासकीय आणि शैक्षणिक जबाबदारीसह अखंडपणे समायोजित केले जाणार आहे.** या धोरणाचा उद्देश शैक्षणिक संस्थांचे एक शक्तिशाली जाळे तयार करणे, संसाधने, कौशल्ये आणि नाविन्यपूर्ण कल्पना एकत्र करून विद्यार्थ्यांना समग्र व परिपूर्ण शिक्षण अनुभव प्रदान करणे हे आहे.

७. या मार्गदर्शक तत्त्वांचा समूह विद्यापीठे स्थापन करण्यासाठी इच्छुक असलेल्या संस्थाना, प्रशासकांना व इतर शैक्षणिक भागधारकांना एक व्यापक संसाधन म्हणून उपयोग होणार आहे. **त्यामुळे मार्गदर्शक तत्त्वांचा मसुदा सर्व शैक्षणिक भागधारकांच्या विचारार्थ व अभिप्रायार्थ विभागाच्या सार्वजनिक संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आला होता.** सर्व शैक्षणिक भागधारकांकडून प्राप्त झालेल्या सूचनांचा/अभिप्रायांचा शासनस्तरावरून विचार करून राज्यामध्ये समूह विद्यापीठे स्थापन करण्यासाठीच्या धोरणाच्या अनुषंगाने मार्गदर्शक तत्त्वे अंतिम करण्यासाठीचा प्रस्ताव दि. १७ नोव्हेंबर, २०२३ रोजी झालेल्या मा.मंत्रीमंडळ बैठकीत सादर करण्यात आला होता. मा.मंत्रीमंडळाने दिलेल्या मान्यतेनुसार समूह विद्यापीठे स्थापन करण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वे निश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

### शासननिर्णय

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने शैक्षणिक क्षेत्रामध्ये बदलत असलेल्या विज्ञान, तंत्रज्ञान आणि कौशल्यपूर्ण वातावरणाचा वापर करून बहुविद्याशाखीय अभ्यासक्रम राबवून विद्यार्थ्यांना समग्र व परिपूर्ण शिक्षण प्राप्त होण्याच्या दृष्टीने राज्यात समूह विद्यापीठे स्थापन करण्यासाठी खालीलप्रमाणे मार्गदर्शक तत्त्वे विहित करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे.

**(१) समूह विद्यापीठाच्या निर्मितीसाठी आवश्यक निकष :-**

**(अ) महाविद्यालयांची संख्या :**

**(i)** समूह विद्यापीठ तयार करण्यासाठी, एकाच व्यवस्थापन/शैक्षणिक संस्थेच्या अधिपत्याखालील एकाच जिल्ह्यातील **किमान २ व कमाल ५ अनुदानित/विनाअनुदानित महाविद्यालयांच्या संसाधने,** शैक्षणिक, भौतिक आणि तांत्रिक सुविधांचे एकत्रीकरण करणे आवश्यक राहील, **यापैकी किमान एक महाविद्यालय अनुदानित महाविद्यालय असणे आवश्यक राहील.**

**(ii)** कृषी व आरोग्य विज्ञान अभ्यासक्रम वगळता उच्च व तंत्रशिक्षण विभागांतर्गत येत असलेली सर्व पारंपारिक व व्यावसायिक महाविद्यालये समूह विद्यापीठामध्ये समाविष्ट होण्यास पात्र असतील.

**(iii)** व्यवस्थापन/शैक्षणिक संस्थेची क्षमता असेल तर ५ पेक्षा जास्त महाविद्यालये/संस्था समूह विद्यापीठामध्ये समाविष्ट करण्यासाठी राज्यशासन प्रकरणनिहाय मूल्यांकन करू शकेल.

**(ब) संस्थात्मक आवश्यकता**

**(i)** प्रशासकीय अनुभव :

**(a)** समूह विद्यापीठातील प्रमुख महाविद्यालय मागील २० वर्षांपासून अस्तित्वात असले पाहिजे.

**(ii)** किमान नोंदणी :

**(a)** प्रमुख महाविद्यालयात किमान २००० विद्यार्थ्यांची नोंदणी आवश्यक (सर्व अभ्यासक्रमांचा समावेश करून)

**(b)** सर्व सहभागी महाविद्यालयांमध्ये (प्रमुख महाविद्यालयासह) किमान ४००० विद्यार्थ्यांची नोंदणी आवश्यक (सर्व अभ्यासक्रमांचा समावेश करून)

**(iii)** भौतिक समीपता : समूह विद्यापीठ स्थापन करण्यासाठी, सहभागी महाविद्यालयांमध्ये योग्य भौतिक निकटता सुनिश्चित करणे आवश्यक आहे. **या समीपतेमुळे भौतिक संसाधने आणि मानवी संसाधनांचे सामायिकीकरण करणे शक्त होते.** तसेच, विद्यार्थी आणि प्राध्यापकांना गतीविधी करणे सुलभ होते.

**(a)** समूह विद्यापीठामध्ये सहभागी होण्यासाठी, प्रमुख महाविद्यालय ज्या जिल्ह्यामध्ये कार्यरत आहे त्याच जिल्ह्यामध्ये घटक/सहभागी महाविद्यालये असणे आवश्यक आहे. समूह विद्यापीठामध्ये समन्वय साधण्यात आणि समूह विद्यापीठामध्ये समाविष्ट घटक महाविद्यालयांमध्ये कार्यक्षम सहकार्य आणि संसाधनांची देवाणघेवाण करण्यात प्रमुख महाविद्यालय मध्यवर्ती भूमिका बजावते.

**(iv)** जागेची उपलब्धता आणि आवश्यक बांधकाम : समूह विद्यापीठामध्ये सहभागी सर्व महाविद्यालयांकडे एकत्रितपणे -

**(a)** किमान १५००० चौमी इतके एकत्रित बांधकाम क्षेत्र असणे आवश्यक आहे. या व्यतिरिक्त, दि. १५.०९.२०१७ च्या शासननिर्णयात नमूद केलेले निकष तसेच इमारत बांधकाम आणि भौतिक सुविधांबाबत यूजीसी/AICTE व

इतर शिखर संस्थांनी निश्चित केलेल्या निकषांची पूर्तता करणे आवश्यक आहे.

आणि

**(b)** बृहन्मुंबई महानगरपालिका व ठाणे महानगरपालिका क्षेत्रामध्ये स्वयं अर्थसहाय्यित Vertical University Campus स्थापन करण्यासाठी निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णय क्र. स्वअवि-२०२०/(११/२०)/विशि-४ दि.०१ ऑगस्ट, २०२३ मध्ये नमूद केल्यानुसार बांधकाम क्षेत्र आणि सुविधांसाठी आवश्यक असलेली किमान जमीन.

**(c)** विभागीय मुख्यालयी (कोकण, नागपूर, औरंगाबाद, पुणे, नाशिक, अमरावती) ४ हेक्टर जागा.

**(d)** राज्यातील उर्वरीत भागात ६ हेक्टर जागा.

**(क) शैक्षणिक मानके :**

**(i) स्वायत्तता, नॅक (NAAC) मानांकन, एनबीए गुण :-**

**प्रमुख महाविद्यालय** - समूह विद्यापीठामध्ये सहभागी होण्यास पात्र ठरण्यासाठी खालीलपैकी कोणतीही एक अट पूर्ण केली पाहिजेत.

**(a)** प्रमुख महाविद्यालय हे किमान ५ वर्षापासून स्वायत्त दर्जा प्राप्त असलेले महाविद्यालय असेल.

किंवा

**(b)** प्रमुख महाविद्यालयास नॅक (NAAC) चे किमान ३.२५ CGPA मानांकन किंवा समतुल्य एनबीए (NBA) गुण असणे आवश्यक आहे.

किंवा

**(c)** प्रमुख महाविद्यालयातील एकूण अभ्यासक्रमांपैकी ५०% अभ्यासक्रम NBA द्वारे मान्यताप्राप्त असणे आवश्यक आहे.

**घटक महाविद्यालय** - सर्व सहभागी महाविद्यालयांना वैध नॅक (NAAC) मानांकन आणि/किंवा प्रत्येक महाविद्यालयात किमान ३०% अभ्यासक्रमांना NBA मान्यता असणे आवश्यक आहे.

**(ii) संशोधन केंद्र :** संलग्न विद्यापीठाने मंजूर केलेली आणि विहित यूजीसी नियमांनुसार असलेली किमान दोन कार्यरत संशोधन केंद्रे असणे आवश्यक आहे.

**(iii) संशोधन क्षमता :** प्रमुख आणि सहभागी घटक महाविद्यालयांनी प्रकाशने, संशोधन प्रकल्प हाती घेतलेले असणे आणि संशोधक विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून उत्कृष्ट संशोधनाचे कार्यप्रदर्शन केले असणे आवश्यक आहे.

**(iv) शैक्षणिक कामगिरी :** प्रमुख आणि सहभागी घटक महाविद्यालयांनी आंतरविद्याशाखीय अध्यापन आणि संशोधन कार्यक्रमांमध्ये उच्च शैक्षणिक कामगिरी केलेली पाहिजे.

**(v) संसाधनांचे एकत्रीकरण : प्रस्तावित समूह विद्यापीठ उपलब्ध सार्वजनिक निधी व्यतिरिक्त इतर स्त्रोतांद्वारे संसाधने वाढवण्यास/संकलित करण्यास सक्षम असावे.**

**(ड) किमान ठेव : समूह विद्यापीठाच्या निर्मितीमध्ये सहभागी होण्यासाठी, समूह विद्यापीठाच्या स्थापनेनंतर आर्थिक हमी म्हणून उच्च शिक्षण संचालनालयासोबत**

## IN THE HIGH COURT OF JUDICATURE AT BOMBAY : NAGPUR BENCH, NAGPUR.
## WRIT PETITION NO. 5381 OF 2022

Smt. Samidha Wd/o. Sanjay Nakade, Aged about : 42 yrs. Occ. Household, R/o. Ward No. 5, Adarsha Colony, Nawargaon, Tal. Sindewahi, Dist. Chandrapur-441223**....PETITIONER //VERSUS// (1)** State of Maharashtra, Through its Secretary, Department of Higher and Technical Education, Mantralaya, Mumbai-400032 **(2)** The Director of Higher Education, State of Maharashtra, Central Building, Pune – 411001 **(3)** The Joint Director of Higher Education, Nagpur Division, Old Morris College Compound, Civil Lines, Nagpur 440001 **(4)** The Auditor General, Pension and Retirement Benefits, State of Maharashtra, Civil Lines, West High Court Road, Nagpur 440001 **(5)** Shri Dnyanesh Mahavidyalaya, Nawargaon, through its Principal, Chimur-Bypass road, Nawargaon, Tal. Sindewahi, Dist. Chandrapur- 441223**...RESPONDENTS** Mr. B. G. Kulkarni, Advocate for the petitioner Mr A. M. Joshi, AGP for respondent Nos.1 to 4 Mr Sachin Deshpande, Advocate for respondent No.5

### CORAM : SMT ANUJA PRABHUDESSAI AND MRS VRUSHALI V. JOSHI, J J .
### DATE : DECEMBER 11, 2023.
### ORAL JUDGMENT: (PER : SMT ANUJA PRABHUDESSAI, J.)

**1.** Heard.

**2. RULE.** Rule made returnable forthwith. Heard finally with the consent of learned counsel for the respective parties.

**3.** The petitioner is the widow of Sanjay Nakade, **who was appointed as a part time lecturer with respondent No.5-College on 12.07.1999. His appointment was upgraded as full time lecturer with effect from 01.07.2005.** He expired on 14.10.2020. The respondent No. 5 - College submitted a proposal to respondent No. 3 for grant of retirement benefit and family pension in favour of the petitioner.

**4.** The respondent No. 3 rejected the said proposal inter alia on the ground that the husband of the petitioner was appointed as full time lecturer on 01.07.2005, **he was non NET/SET lecturer** and had not obtained prescribed qualification within the stipulated period. As per the Government Resolution dated 29.10.2021 the non NET/SET lecturers appointed with effect from 23.10.1992 to 03.04.2000 are entitled for pensionery benefits as per the Old Pension Scheme.

**5. The petitioner claims that the respondent No.3 has not taken into consideration the approved part time service from 12.07.1999 to 30.06.2005,** which is to be treated as qualifying service. The husband of the petitioner had to his credit total qualifying service of 18 years, 03 months and 08 days. Hence, by this petition, the petitioner has sought directions against the respondents to count half of the part time service rendered by her husband from 12.07.1999 to 30.06.2005 and to sanction the gratuity and family pension on the basis of total qualifying service of 18 years, 03 months and 08 days as per the provisions of the Maharashtra Civil Service (Pension) Rules, 1982 and further to release and pay the gratuity amount and family pension with effect from 15.10.2020, as per the Rules.

**6.** Learned counsel for the petitioner states that in ***Writ Petition No. 8656/2018 (Surekha Wd/o. Vinayak Kathardekar .v/s. Joint Director Higher Education, Government Polytechnic College Campus, Sadar Nagpur and another)*** the Co-ordinate Bench of this Court has considered the said issue and similarly placed petitioners were held to be entitled for grant of pensionery benefits. The challenge by the State to the said Judgment in Special Leave to Appeal (C) No. 12520/2021 was dismissed by the Hon'ble Supreme Court. The facts raised in this petition are identical. The issue having been squarely covered by the decision in the aforestated case, the petitioner is entitled for the pensionery benefits.

**7. In view of the above, the petition is allowed in terms of prayer clause (i), (ii) and (iii).**

**8.** Rule is made absolute in the above terms. The writ petition stands **disposed of,** accordingly.

**(VRUSHALI V. JOSHI, J.) (ANUJA PRABHUDESSAI, J.)**

**रु. ५ कोटी रक्कमेची ५ वर्ष कालावधीची संयुक्त मुदत ठेव अनिवार्य आहे.** आर्थिक व्यवहार्यता तसेच विद्यापीठामार्फत सुरू असलेले उपक्रम चालू ठेवण्यासाठी विद्यापीठाची सक्षमता दर्शविण्यासाठी ही ठेव आवश्यक आहे. मुदत ठेवीवर जमा होणारे व्याज समूह विद्यापीठाच्या उपक्रमांसाठी वापरले जाऊ शकते.

**(इ) इतर आवश्यक बाबी :**

**(i) डिजिटल पायाभूत सुविधा :** प्रमुख आणि सहभागी घटक महाविद्यालयांमध्ये अध्यापन, शिक्षण आणि प्रशासनासाठी अद्यावत नेटवर्कींग सुविधांसह डिजिटल पायाभूत सुविधा असणे आवश्यक आहे.

**(ii) उद्योग सहयोग :** प्रस्तावित समूह विद्यापीठाने संशोधन सहयोगासाठी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय संस्था/उद्योगांसह भागीदारीची सद्यस्थिती सादर केली पाहिजे, तसेच प्रशिक्षणार्थी/इंटर्नशिप आणि एम्बेडेड पदवी कार्यक्रम प्रदान केले पाहिजेत आणि त्याच्या वाढीसाठी आणि विस्तारासाठी आराखडा सादर केला पाहिजे.

**(iii) पीएच.डी. स्तरावरील शैक्षणिक अभ्यासक्रम :** समूह विद्यापीठाच्या प्रस्तावात पीएच.डी. अभ्यासक्रम, संशोधन कार्य आणि नवकल्पनांचा समावेश असावा.

**(iv) माहिती तंत्रज्ञान आणि स्टार्ट-अप केंद्रे :** प्रस्तावित समूह विद्यापीठासाठी माहिती तंत्रज्ञान केंद्र, स्टार्ट-अप सेंटर, इनोव्हेशन आणि इनक्युबेशन सेंटर आणि इतर संबंधित डोमेनची स्थापना अनिवार्य असेल.

**(v) बळकट प्रशासन संरचना :** प्रस्तावित समूह विद्यापीठामध्ये नियामक संस्थांनी निर्दिष्ट केलेल्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार एक बळकट अंतर्गत प्रशासन संरचना असावी. त्यांनी संबंधित वैधानिक संस्था जसे की व्यवस्थापन मंडळ, शैक्षणिक परिषद, अभ्यास मंडळ, संशोधन परिषद, वित्त समिती आणि इतर गैर-वैधानिक समित्या स्थापन केल्या पाहिजेत.

**(vi) पायाभूत सुविधा वाढविणे : समूह विद्यापीठाने विद्यमान इमारतींचे दिव्यांगासाठी पूर्णपणे अनुकूल संरचनांमध्ये रूपांतर करण्याची आणि वर्गखोल्या, प्रयोगशाळा आणि ग्रंथालयांसाठी पुरेशी जागा सुनिश्चित करण्याची योजना आखली पाहिजे.**

**(vii) विद्यार्थ्यांसाठी निवास व्यवस्था :** समूह विद्यापीठाने सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना योग्य प्राधान्य देऊन पुरेशी वसतिगृहाची सोय किंवा विद्यार्थी-विद्यार्थीनीच्या निवासासाठी योग्य व्यवस्था केली पाहिजे.

**(ई) वचनबद्धता :**

प्रस्तावित समूह विद्यापीठाने खालील आवश्यकता आणि अपेक्षा पूर्ण केल्या पाहिजे, ज्या विद्यापीठाच्या DPR मध्ये योग्यरित्या समाविष्ट केल्या जातील :

**(i) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० ची अंमलबजावणी :** प्रस्तावित समूह विद्यापीठाने राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्ये नमूद केलेल्या कृती मुद्यांची अंमलबजावणी स्पष्ट वेळापत्रकासह करण्यास वचनबद्ध असावे.

**(ii) स्थानिक आणि इतर भारतीय भाषांमध्ये अभ्यासक्रम उपलब्ध करणे :** प्रस्तावित समूह विद्यापीठाने प्रादेशिक गरजा पूर्ण करण्यासाठी आणि राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० अंतर्गत शिफारसीत केल्याप्रमाणे भाषिक विविधतेला प्रोत्साहन देण्यासाठी मराठी आणि इतर भारतीय भाषांमध्ये काही अभ्यासक्रम

---

*राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांना अनुज्ञेय महागाई भत्त्याच्या दरात दिनांक १ जुलै, २०२३ पासून सुधारणा करण्याबाबत.*

## महाराष्ट्र शासन : वित्त विभाग

*शासन निर्णय क्रमांक : मभवा-१३२३/प्र.क्र.१६/सेवा-९*

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई ४०००३२

**दिनांक : २३ नोव्हेंबर, २०२३**

**वाचा :** भारत सरकार, वित्त मंत्रालय, व्यय विभाग कार्यालयीन ज्ञापन क्रमांक : १/४/२०२३-इ.II (बी), दिनांक २० ऑक्टोबर, २०२३

### शासननिर्णय

राज्य शासकीय कर्मचारी व इतर पात्र पूर्णकालिक कर्मचाऱ्यांना अनुज्ञेय महागाई भत्त्याच्या दरात सुधारणा करण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता.

२. शासन असे आदेश देत आहे की, **दिनांक १ जुलै, २०२३ पासून ७ व्या वेतन आयोगानुसार सुधारित वेतनसंरचनेतील मूळ वेतनावरील अनुज्ञेय महागाई भत्त्याचा दर ४२% वरून ४६% करण्यात यावा.** सदर महागाई भत्ता वाढ दिनांक १ जुलै, २०२३ ते दिनांक ३१ ऑक्टोबर, २०२३ या कालावधीतील थकबाकीसह माहे नोव्हेंबर, २०२३ च्या वेतनासोबत रोखीने देण्यात यावी.

३. महागाई भत्त्याची रक्कम प्रदान करण्यासंदर्भातील विद्यमान तरतुदी व कार्यपद्धती आहे त्याचप्रकारे यापुढे लागू राहील.

४. यावर होणारा खर्च संबंधित शासकीय कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते ज्या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात येतात, त्या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकून त्याखालील मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा. अनुदानप्राप्त संस्था व जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांच्या बाबतीत, संबंधित प्रमुख लेखाशीर्षाखालील ज्या उप लेखाशीर्षाखाली त्यांच्या सहाय्यक अनुदानाबाबतचा खर्च खर्ची टाकण्यात येतो, त्या उप लेखाशीर्षाखाली हा खर्च खर्ची टाकण्यात यावा.

सदर शासननिर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२३११२३१६३३१६१७०५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

**(वि.अ.धोत्रे)**

**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

PR : (1) P 16 NB 2019 (2) P 140 NB 2019 (3) P 12 NB 2020 (4) P 279 NB 2021 (5) P 100 NB 2022 (6) P 165 NB 2022 (6) P 28 NB 2023 (7) P 116 NB 2023 (8) P 116 NB 2023

---

*Dearness Relief Increase to 46% on Pension/ Family Pension w.e.f. 1st July, 2023.*

**GOVERNMENT OF MAHARASHTRA**
**FINANCE DEPARTMENT**

Government Resolution No.: DRP-2023/CR. 94 /SER-4
Hutatma Rajguru Chowk, Madam Cama Road, Mantralaya, Mumbai 400 032.

**Date: 23 November 2023.**

**Read -** Government Resolution, Finance Department No.: DRP-2023/C.R 60/SER-4, dated 05.07.2023.

**RESOLUTION**

Government is pleased to decide that **the rate of dearness relief with effect from 1st July, 2023 will be revised from 42% to 46% to the State Government pensioners /family pensioners** on their Basic Pension/Family Pension. Revised dearness relief with arrears from 1st July 2023 will be payable in cash with pension / family pension of the month of November 2023.

**2.** It will be the responsibility of the Pension Disbursing Authority, i.e. the Pay and Accounts Officer, Mumbai/Treasury Officers, as the case may be, to calculate the quantum of dearness relief payable in each individual case.

**3.** Government is also pleased to direct that above decision should mutatis mutandis, apply to those pensioners including family pensioners of Recognised and Aided Educational Institutions, Agricultural / Non-Agricultural Universities and Affiliated Non-Government colleges to whom the pension scheme is made applicable.

**4.** In exercise of the powers conferred by the proviso to Section 248 of the Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis Act, 1961 (Mah.V of 1962) and of all the other powers enabling it in that behalf. Government is further pleased to decide that the above decision shall apply to the pensioners including family pensioners of Zilla Parishads.

**5.** The expenditure on this account should be debited to the Budget Heads to which the retirement benefits of the employees mentioned in the above paras are debited and should be met from the grants sanctioned thereunder.

**6.** All orders in force in regard to the payment of relief on pension sanctioned by Government from time to time will, mutatis mutandis, apply to the dearness relief now sanctioned.

**7.** This Government resolution of Maharashtra Government is available at the website www.maharashtra.gov.in. Reference no. for this is 202311231738516405 This order has been signed digitally.

By order and in the name of the Governor of Maharashtra.

**(Manisha Y. Kamte)**

Deputy Secretary to Government of Maharashtra

PR : (1) P 20 NB 2019 (2) P 137 NB 2019 (3) P12 NB 2020 (4) P 281 NB 2021 (5) P 101 NB 2022 (6) P 165 NB 2022 (7) P 27 NB 2023 (8) P 127 NB 2023 (9) P 000 NB 2023

उपलब्ध करण्यासाठी वचनबद्ध असले पाहिजे.

**(iii) नवीन श्रेयांक आराखडा :** प्रस्तावित समूह विद्यापीठाने राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या अनुषंगाने शैक्षणिक व श्रेयांक आराखड्यासंदर्भात शासनाने दिलेल्या निर्देशांचे पालन केले पाहिजे.

**(iv) विद्यापीठ अनुदान आयोग व राज्य शासनाच्या मार्गदर्शक तत्त्वांचे पालन :** राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाबाबत विद्यापीठ अनुदान आयोग आणि राज्यशासनाने निर्गमित केलेल्या सूचना व मार्गदर्शक तत्त्वांचे काटेकोरपणे पालन करावे.

**(v) सुविधा आणि उपक्रमांची भागीदारी :** सर्व महाविद्यालयांनी (प्रमुख आणि सहभागी घटक महाविद्यालय) विद्यमान सुविधा सामायिक (एकत्रित) करण्यास सहमती दर्शविली पाहिजे आणि प्रवेश, समानता आणि शिक्षणाची गुणवत्ता वाढविण्यासाठी संयुक्त उपक्रम हाती घेतला पाहिजे.

**(vi) आयसीटी सक्षम वापर :** शैक्षणिक संस्थेने समूह विद्यापीठामधील सर्व महाविद्यालयांमध्ये अध्यापन, शिक्षण आणि मूल्यमापन प्रक्रियेमध्ये माहिती आणि संप्रेषण तंत्रज्ञान (ICT) समाविष्ट करण्यासाठी वचनबद्ध असले पाहिजे. यामध्ये विद्यार्थ्यांना इंटरनेट सुविधा, लायब्ररीमध्ये डिजीटल डेटाबेस, लर्निंग मॅनेजमेंट सिस्टिम (LMS) डिजिटल सामग्री उपलब्ध केली पाहिजे.

## *महाराष्ट्र शासन*
## *शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)*

महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-४११००१
Web : www.dhepune.gov.in E-mail : mavi.dhepune@gov.in
फोन नं. ०२०-२६१२२११९/२६०५१५१२, २६१३०६२७, २६१२४६३९ फॅक्स नं. ०२०-२६१११११५३

*क्र.उशिसं/कॅस/एम.फील/२०२२/विशि-१/१५०५३*

**दिनांक : २३ नोव्हेंबर २०२३**

प्रति,
सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण

**विषय : दिनांक १४ जून २००६ पूर्वी नियुक्त एम.फील. अर्हताधारक अध्यापकांना कॅसचे लाभ लागू करणेबाबत.**

**संदर्भ :** (१) शासन पत्र संकीर्ण-२२०४/प्र.क्र.९१/विशि-१ दि. १६.११.२०२२ (२) शासन पत्र संकीर्ण-२२०४/प्र.क्र.९१/विशि-१ दि. १६.०२.२०२३ (३) सर्व विभागीय सहसंचालकांना लिहिलेले संचालनालयाचे पत्र समक्रमांक /१७४७ दिनांक १७.०२.२०२३ (४) एमफुक्टो संघटनेची बैठक दिनांक २०.१०.२०२३

संचालनालयामध्ये एमफुक्टो संघटनेची बैठक दिनांक २०.१०.२०२३ रोजी झालेल्या बैठकीमध्ये विषयांकित प्रकरणी चर्चा झाली. प्रस्तुत विषयासंदर्भात शासनाने दिनांक १६.११.२०२२ व दिनांक १६.०२.२०२३ च्या पत्रान्वये स्वयंस्पष्ट निर्देश दिलेले असून सर्व विभागांमध्ये त्याची समान अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. याबाबत सर्व सहसंचालकांना संचालनालयाचे पत्र समक्रमांक/१७४७ दिनांक १७.०२.२०२३ निर्गत झाले आहे. तरी शासनाने दिनांक १६.११.२०२२ व दिनांक १६.०२.२०२३ च्या पत्रान्वये दिलेले खालील निर्देश पुनःश्च कळविण्यात येत आहे.

विद्यापीठ अनुदान आयोगाने एम.फील. अर्हताधारक अध्यापकांना कॅस अंतर्गत पदोन्नतीच्या लाभासंदर्भात विद्यापीठ अनुदान आयोगाने निर्गमित केलेल्या दि. ०५ सप्टेंबर २०२२ रोजीच्या पत्राच्या अनुषंगाने शासनपत्र क्र. संकीर्ण-२२०४/प्र.क्र.९१/विशि-१ दि. १६.०२.२०२३ नुसार खालीलप्रमाणे सूचना दिलेल्या आहेत.

विद्यापीठ अनुदान आयोगाने दिनांक ०५.०९.२०२२ रोजीच्या पत्रान्वये विहित निवड समितीच्या माध्यमातून दि. १४.६.२००६ पूर्वी नियुक्त झालेल्या व ज्यांनी सेवेत असतांना, दि.०१.०१.१९९४ ते दि.११.०७.२००९ या कालावधीत एम.फील. ही शैक्षणिक अर्हता धारण केली आहे, तसेच ज्यांना विद्यापीठ अनुदान आयोगाने एम.फील. अर्हतेच्या आधारे नेट मधून सूट दिलेली आहे व विद्यापीठाने नियमित मान्यता दिलेली आहे, असे अध्यापक एम.फील. अर्हता धारण केल्याच्या दिनांकापासून कॅस अंतर्गत पदोन्नतीसाठी पात्र आहेत, असे कळविलेले आहे. त्याअनुषंगाने असे स्पष्ट करण्यात येते की, दि. १४.६.२००६ पूर्वी ज्या अध्यापकांनी सेवेत असताना एम.फील. अर्हता धारण केली असेल, तसेच ज्या अध्यापकांनी दि. १४.०६.२००६ पूर्वी नियुक्तीवेळी एम.फील. अर्हता धारण केली होती, अशा अध्यापकांची नियुक्ती जर विहित निवड समितीच्या माध्यमातून झाली असेल तसेच अशा अध्यापकांना विद्यापीठ अनुदान आयोगाने एम.फील. अर्हतेच्या आधारे नेट परिक्षेमधून सूट देऊन त्यांच्या नावासहित तसे संबंधित विद्यापीठांना कळविलेले असेल व विद्यापीठाने नियमित स्वरूपात मान्यता दिलेली असेल, तर (१) ज्या अध्यापकांनी नियुक्तीपूर्वी एम.फील. अर्हता धारण केली असेल, त्यांना नियुक्तीपासून व (२) **ज्यांनी सेवेत असताना एम.फील. अर्हता धारण केली असेल, त्यांना सदर अर्हता धारण केल्याच्या दिनांकापासून कॅस अंतर्गत पदोन्नतीचे लाभ देय राहतील.**

उपरोक्त प्रमाणे एम.फील. अर्हताधारक अध्यापकांना कॅसचे लाभ देणेबाबत शासनस्तरावरून प्राप्त झालेल्या निर्देशानुसार कार्यवाही करण्यात यावी.

**(डॉ.शैलेंद्र देवळाणकर)**
शिक्षण, संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे-१

## *महाराष्ट्र शासन : उच्च व तंत्र शिक्षण विभाग,*

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई-४०००३२

***क्रमांक : संकिर्ण-२२०४/प्र.क्र.९१/विशि-१***

**दिनांक : ३० नोव्हेंबर २०२३**

**प्रति,**
(१) संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे (२) सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण

**विषय : एम.फील. अर्हताधारक अध्यापकांना कॅसचे लाभ लागू करण्याबाबत.**

**संदर्भ :** (१) विद्यापीठ अनुदान आयागाचे पत्र क्र.एफ-९-१२/२०२०/(पीएस/एमआयएससी) दिनांक ५ सप्टेंबर २०२२ (२) समक्रमांकाचे दिनांक १६ फेब्रुवारी २०२३ चे पत्र (३) मा.डॉ.मनीषा कायंदे, वि.प.सदस्य यांचे पत्र क्रमांक ८८१/२०२३ दिनांक २ नोव्हेंबर २०२३

एम.फील. अर्हता धारण केलेल्या अध्यापकांना नेट परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट देण्यासंदर्भात दिनांक १६ फेब्रुवारी २०२३ च्या पत्रान्वये स्पष्टीकरण देण्यात आले आहे. सदर पत्राचा चुकीचा अर्थ लावून दिनांक १४ जून २००६ ते दिनांक ११ जुलै २००९ या दरम्यान एम.फील. झालेल्या अनेक अध्यापकांना कॅस प्रमोशन नाकारण्यात आल्याची बाब मा.डॉ.कायंदे यांनी निदर्शनास आणली आहे. यास्तव, उपरोक्त दिनांक १६ फेब्रुवारी २०२३ च्या पत्रामध्ये सुधारणा करण्याची विनंती मा.डॉ.कायंदे यांनी केली आहे.

**०२.** विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दिनांक ५ सप्टेंबर २०२२ च्या पत्रान्वये एम.फील. पात्रतेसंदर्भात पुढीलप्रमाणे स्पष्टीकरण/मान्यता देण्यात आली आहे.:-

the teachers appointed through duly constituted selection committee on or before 14th June, 2006 **and have acquired M.Phil. degree in service between 1st January, 1994 to 11th July, 2009 are entitled for Career Advancement Scheme (CAS) and all consequential benefits as per norms, provided that those teachers** have received exemption from NET, on the basis of M.Phil/Ph.D. Further, the actual **date of effect for grant of exemption to particular candidates shall be the date of exemption actually granted by the Universities** to the concerned candidates appointed on "Regular Basis" and fulfilment of eligibility criteria of the then Regulations.

**०३.** विद्यापीठ अनुदान आयोगाच्या उपरोक्त पत्रान्वये देण्यात आलेल्या सूचना विचारात घेऊन खालीलप्रमाणे कळविण्यात येत आहे.:-

दिनांक १४ जून २००६ रोजी अथवा तत्पुर्वी नियुक्त झालेल्या अध्यापकांनी ***सेवेत असताना*** दिनांक १ जानेवारी १९९४ ते ११ जुलै २००९ या कालावधीत एम.फील. ही पदवी प्राप्त केली असल्यास त्यांना खालील अटी व शर्तीच्या अधीनतेने कॅस अंतर्गत पदोन्नतीचे लाभ अनुज्ञेय होतील.

(१) अध्यापकांची नियुक्ती विहित निवड समितीच्या माध्यमातून झालेली असावी.

(२) विद्यापीठ अनुदान आयोगाने विहित केलेली अर्हता सदर अध्यापकांनी पूर्ण करणे आवश्यक आहे.

(३) अध्यापकांची नियुक्ती नियमित स्वरूपात असणे आवश्यक आहे.

(४) अश्या अध्यापकांना एम.फील./पीएच.डी. या पदव्यांच्या आधारे एन.ई.टी. परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट देऊन विद्यापीठ अनुदान आयोगाने त्यांच्या नावासहित तसे संबंधित विद्यापीठांना कळविले असणे आवश्यक आहे.

वरील अटींची पूर्तता करणाऱ्या अध्यापकांना पुढीलप्रमाणे कॅस अंतर्गत पदोन्नतीचे लाभ अनुज्ञेय होतील :-

(अ) अध्यापकांनी नियुक्तीपूर्वी एम.फील. अर्हता धारण केली असेल तर त्यांना नियुक्तीच्या दिनांकापासून कॅस अंतर्गत पदोन्नतीचे लाभ अनुज्ञेय होतील.

(ब) **अध्यापकांनी सेवेत असताना एम.फील. अर्हता धारण केली असेल तर, विद्यापीठ अनुदान आयोगाने दिलेली मान्यता विचारात घेऊन, विद्यापीठाने संबंधित उमेदवाराला ज्या दिनांकापासून परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट दिली असेल अशा दिनांकापासून त्याला कॅस अंतर्गत पदोन्नतीचे लाभ अनुज्ञेय होतील.**

**(अजित बाविस्कर)** उप सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत :** (१) मा.डॉ.मनीषा कायंदे, विधानपरिषद सदस्य (२) अध्यक्ष, महाराष्ट्र युनियन ऑफ सेक्यूलर टिचर्स (३) निवड नस्ती कार्यासन विशि-१

**(vii) कार्य मूल्यांकन प्रणाली :** अध्यापन आणि अध्यापनशास्त्रातील गुणवत्ता आणि प्रभाव राखण्यासाठी अध्यापन आणि अध्यापनशास्त्रातील नावीन्यता ओळखण्यासाठी सर्वसमावेशक अभिप्राय आणि कार्यप्रदर्शन मूल्यमापन प्रणाली लागू केली पाहिजे.

**(viii) अध्यापकांना प्रोत्साहन :** योग्य पुरस्कार, पदोन्नती, ओळख आणि नेतृत्व संधीद्वारे अध्यापकांच्या उत्कृष्टतेला प्रोत्साहन दिले पाहिजे.

**(ix) राज्यशासनाच्या धोरणानुसार आरक्षण :** प्रस्तावित समूह विद्यापीठाने राज्यशासनाच्या लागू असलेल्या आरक्षण धोरणाचे काटेकोरपणे पालन करावे.

**(x) दिव्यांगांसाठी अनुकूल पायाभूत सुविधा :** समूह विद्यापीठामधील महाविद्यालयांच्या सर्व इमारती दिव्यांग-अनुकूल असायला हव्यात, दिव्यांग व्यक्तींच्या गरजा पूर्ण करण्यासाठी योग्य भौतिक सुविधा पुरवल्या पाहिजेत.

**(xi) गरजू विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती : समूह विद्यापीठाने गरजू विद्यार्थ्यांना ट्यूशन फी माफी आणि आवश्यकतेनुसार इतर आर्थिक मदत देण्याचे वचन दिले पाहिजे. डीपीआरमध्ये विद्यार्थ्यांची संख्या आणि शिष्यवृत्तीचा लाभ घेण्यासाठी पात्र निकष नमूद केले पाहिजेत.**

**(xii) शैक्षणिक, परीक्षा आणि प्रशासन सुधारणा :** समूह विद्यापीठाने शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार शैक्षणिक, परीक्षा आणि प्रशासन सुधारणांसाठी वचनबद्ध असले पाहिजे.

**(xiii) प्रशासकीय तत्त्वे :** प्रस्तावित समूह विद्यापीठाने सहभागी घटक महाविद्यालयांना समान दर्जा, सामूहिक निर्णय घेणे, स्वायत्तता आणि जबाबदारी, स्वातंत्र्य आणि परस्परावलंबन, संस्थांची भागीदारी आणि सामाजिक उत्तरदायित्व या तत्त्वांचे पालन केले पाहिजे.

**(xiv) विविध अभ्यासक्रमांचे शैक्षणिक शुल्क :** महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १०१ मधील तरतुदीनुसार शिक्षण शुल्क समितीची स्थापना करणे बंधनकारक राहील व या समितीवर शासन प्रतिनिधी नियुक्त करणे आवश्यक असेल. **मा.राज्यपाल नियुक्त प्रतिनिधी व शासन प्रतिनिधी सदर समितीच्या बैठकीस उपस्थित नसल्यास बैठकीची गणपुर्ती पूर्ण होणार नाही.**

**(उ) समूह विद्यापीठासाठी तपशीलवार प्रकल्प अहवाल/प्रस्ताव (DPR) :** तपशीलवार प्रकल्प अहवाल (DPR) मध्ये, उपरोक्त निकष, आवश्यक बाबी, वचनबद्धतेसोबतच, पुढील गोष्टींचा समावेश असणे आवश्यक आहे :

**(i) शैक्षणिक संस्थेचा विकास आराखडा :** प्रस्तावित समूह विद्यापीठाने राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP) २०२० च्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने पुढील पाच वर्षांच्या कालावधीचा तपशीलवार आराखडा तयार करणे आवश्यक आहे.

**(ii)** इतर सार्वजनिक आणि खाजगी विद्यापीठांप्रमाणे विद्यार्थ्यांना राज्यातील सहभागी महाविद्यालयांमध्ये अभ्यासक्रम आणि श्रेयांकांसह प्रवेश घेणे आणि ते उपलब्ध होणे सुलभ होण्यासाठी डीपीआरमध्ये प्रस्तावित समूह विद्यापीठाच्या महाविद्यालयांद्वारे विद्यार्थ्यासाठी अभ्यासक्रम आणि श्रेयांक प्रणाली उपलब्ध करण्याच्या विस्तृत धोरणांचा समावेश असावा.

**(iii) पदवी, पदव्युत्तर आणि पीएच.डी. अभ्यासक्रम :** डीपीआरमध्ये नाविन्यपूर्ण बहुविद्याशाखीय पदवी, पदव्युत्तर तसेच पीएच.डी. च्या अभ्यासक्रमाची रुपरेषा समाविष्ट करावी. याव्यतिरिक्त, काही कालबद्ध ग्रीनफिल्ड शैक्षणिक कार्यक्रमांचा समावेश असावा.

**(iv)** प्रस्तावित समूह विद्यापीठाने डीपीआरमध्ये बहुविद्याशाखीय दृष्टिकोनासह विद्यमान पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांची रुपरेषा/योजनांचा उल्लेख

आपण स्वतःला जगातली पाचव्या क्रमांकाची अर्थव्यवस्था म्हणवून घेतो, पण इतर विकसित देशांप्रमाणे शिक्षण आणि संशोधनावर खर्च करत नाही, ही आपली सगळ्यात मोठी उणीव आहे.

# पीएच.डी. करून 'दिवे लावायला' तेल आहे कुठे?

**डॉ.महेंद्र मेटे**

*ग्रंथपाल, श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय, अमरावती*

'पीएच.डी. करून काय दिवे लावणार?' असे विधान महाराष्ट्राचे मा.उपमुख्यमंत्री श्री.अजित पवार यांनी केले. यावरून संशोधनाबद्दल सरकार किती गंभीर आहे हे कळते. शालेय शिक्षणमंत्री म्हणतात प्राध्यापकांच्या जागा किती आहेत, त्याकरिता किती प्रमाणात विद्यार्थी पीएच.डी. करतात, या दृष्टीने ते विचार करतात. सरकारमधील दोन्ही मंत्र्यांचे मत हे त्यांची संशोधनाबद्दलची समज दर्शविते. **संपूर्ण जगभर संशोधनाला प्राधान्य दिले जाते कारण संशोधन ही बौद्धिक संपदा निर्माण करण्याची प्रक्रिया आहे. त्यामुळे जगभरातील सरकारे संशोधनात मोठी गुंतवणूक करतात.** त्यामुळे त्यांची विश्वविद्यालये संशोधनाच्या दृष्टीने अद्ययावत व सक्षम आहेत. जागतिक क्रमवारीमध्ये ती विश्वविद्यालये अव्वल दर्जाची आहेत. त्या तुलनेत राज्यातील विद्यापीठांमधील संशोधन व्यवस्था सुमार दर्जाची आहे कारण केंद्र तसेच राज्य सरकारकडून त्यांना पुरेसे अनुदान व मनुष्यबळ मिळत नाही.

जागतिकीकरणाच्या काळात अनेक देशांनी भारतीय विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण व संशोधनासाठी आपल्याकडे आकर्षित केले. याचे महत्त्वाचे कारण आहे त्यांची संशोधनामधील गुंतवणूक. युनेस्कोच्या सांख्यिकी संस्थेच्या २०२० च्या अहवालानुसार जीडीपीच्या तुलनेत संशोधनावर गुंतवणूक करणाऱ्या देशांमध्ये इस्त्रायल (५.३५%), दक्षिण कोरिया (४.८०%), स्वीडन (३.४९%), बेल्जियम (३.४६%) व अमेरिका (३.४२%) हे देश अव्वल स्थानी आहेत. ब्रिक्स देशांमध्ये चीन (२.४%), रशिया (१.१%), ब्राझील (१.१%) हे देश अव्वल आहेत. युनेस्कोच्या अहवालानुसार संशोधनामधील जागतिक गुंतवणूक १.७ ट्रिलियन डॉलर्स एवढी असून जगातील प्रमुख दहा देशांची संशोधनावरील गुंतवणूक जगाच्या गुंतवणुकीच्या ८०% आहे. यावरून विकसित देश संशोधनाला किती प्राधान्य देतात, हे लक्षात येते. जीडीपीच्या तुलनेत भारताची संशोधनावरील गुंतवणूक फक्त ०.६२% एवढी आहे. परंतु जागतिक स्तरावर भारतातील संशोधन प्रकाशन हे गेल्या १५ वर्षांमध्ये २.५ पट वाढले आहे. विज्ञान व तंत्रज्ञानामध्ये चीननंतर भारताचा क्रमांक लागतो. भारतातील संशोधनातील मनुष्यबळ किती उच्च दर्जाचे आहे हे यावरून लक्षात येते. परंतु सरकारची संशोधनासंदर्भातील नकारात्मकता गुंतवणुकीच्या पातळीवर तसेच राज्य व केंद्र स्तरावर दिसून येते. कृषि संशोधनावरील नगण्य खर्च ही चिंतेची बाब असल्याचे मत भारतीय कृषि संशोधन व शिक्षण विभागाचे सचिव डॉ.मंगल रॉय यांनी व्यक्त केले आहे.

**जागतिक पातळीवर जीडीपीच्या तुलनेत संशोधनावरील गुंतवणूक**

| | | | |
|---|---|---|---|
| जागतिक गुंतवणूक | २.५५% | उच्च उत्पन्न देश | २.९४% |
| नॉर्थ अमेरिका | ३.३०% | उच्च मध्यम उत्पन्न देश | १.८०% |
| युरोप व मध्य आशिया | २.१०% | मध्यम उत्पन्न देश | १.७७% |
| पूर्व आशिया व पॅसिफिक | २.५९% | कमी उत्पन्न देश | ०.५९% |
| युरोपीयन युनियन | २.३१% | | |
| दक्षिण आशिया | ०.६४% | | |

जगातील पाचव्या क्रमांकाची अर्थव्यवस्था असलेल्या भारताची संशोधनावरील गुंतवणूक कमी उत्पन्न असणाऱ्या देशांएवढी आहे, ही गंभीर बाब आहे.

**परदेश संशोधन शिष्यवृत्ती :** बौद्धिक संपदेचे महत्त्व लक्षात घेऊन जगातील अनेक विश्वविद्यालयांनी संशोधन शिष्यवृत्ती सुरू केली आहे. ते फक्त स्वतःच्याच देशातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देत नाहीत, तर इतर देशांतील विद्यार्थ्यांनाही शिष्यवृत्ती देतात. महाराष्ट्रात ग्रामीण भागातून आलेले अनेकजण अशा शिष्यवृत्तीचा लाभ घेऊन जागतिक क्रमवारीतील विद्यापीठांमध्ये संशोधन करत आहेत. **नुकतेच एडिनबर्ग विद्यापीठाने अमरावती येथील विद्यार्थ्याला राज्यशास्त्रात पीएच.डी. करण्यासाठी संशोधन शिष्यवृत्ती दिली. तिचे मूल्य १.५० कोटी रुपये एवढे आहे.**

**महाराष्ट्रातील उच्च शिक्षण व संशोधन :** विद्यापीठ अनुदान आयोगाचे माजी अध्यक्ष व शास्त्रज्ञ प्रो.यशपाल यांनी आपल्या अहवालामध्ये नमूद केले की, भारतातील राज्य विद्यापीठे हा उच्च शिक्षणाचा कणा आहे. परंतु हा कणा कमजोर झालेला आहे. त्याला मिळणारे केंद्र सरकारचे अनुदान कमी झाले आहे. तेथे मनुष्यबळाचा अभाव आहे. संशोधनाचे कार्य करणारे विद्यापीठातील विभाग तासिका व कंत्राटी पद्धतीने चालत आहेत. विद्यार्थी व प्राध्यापक यांचे गुणोत्तर प्रमाण वाढलेले आहे. राष्ट्रीय मूल्यांकनांमध्ये महाराष्ट्र देशात अग्रेसर आहे. परंतु येणाऱ्या काळात प्राध्यापकांच्या रिक्त जागा, त्यामुळे कमी झालेले संशोधन, संशोधन अनुदानाचा अभाव या गोष्टी विद्यापीठांना मागे नेणाऱ्या आहेत. त्यामुळे शिक्षण व संशोधनासंदर्भात दृष्टिकोन बदलण्याची गरज आहे.

*लोकसत्तेच्या सौजन्याने*

केला पाहिजे.

**(v)** समूह विद्यापीठाने सुयोग्य व पारदर्शक प्रवेश पद्धती शासनाच्या प्रचलित नियमानुसार डिपीआर मध्ये नमूद करावी.

**(vi)** समूह विद्यापीठाने सर्वंकष खर्चाचा आराखडा निधीच्या वाटपासह व उत्तरदायित्वासह पारदर्शकपणे डिपीआर मध्ये सादर करावा.

**(vii)** शासनाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार, प्रस्तावित समूह विद्यापीठाने डीपीआरमधील अधिकाऱ्यांची सु-परिभाषित संस्थात्मक रचना आणि पदानुक्रमाची रूपरेषा आखली पाहिजे. संरचनेत नेतृत्व स्तर, संस्था, अधिकारी आणि समूह विद्यापीठामधील विविध कार्यांसाठी जबाबदार अधिकारी यांचा समावेश असावा. याव्यतिरिक्त, राज्यशासनाच्या मान्यतेच्या अधीन राहून, अंतर्गत प्रशासन रचनेसाठी आवश्यक असलेल्या इतर कोणत्याही समित्या स्थापन करण्याच्या तरतुदी या प्रस्तावात समाविष्ट केल्या पाहिजेत. यामुळे समूह विद्यापीठाच्या यशस्वी कार्यान्वयनासाठी एक पारदर्शक आणि कार्यक्षम शासकीय संरचनेची हमी मिळते.

**(viii)** प्रस्तावित समूह विद्यापीठाने भविष्यातील विस्तारासाठी अतिरिक्त पायाभूत सुविधा, मनुष्यबळ आणि इतर संसाधनांची आवश्यकता नमूद करावी. डीपीआरमध्ये प्रस्तावित समूह विद्यापीठासाठी आवश्यक असलेल्या आर्थिक संसाधनांच्या एकत्रिकरणासाठीच्या तरतुदींचा स्पष्ट उल्लेख असलेल्या पाच वर्षांच्या आर्थिक अंदाजांचा समावेश असावा.

(२) **समूह विद्यापीठाच्या निर्मितीची प्रक्रिया :**

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ **मधील कलम** ३(६) **मधील तरतुदीनुसार समूह विद्यापीठ स्थापन करण्यात येतील त्यासाठी खालीलप्रमाणे प्रक्रिया राबविण्यात येईल.**

**(i) इच्छुक शैक्षणिक संस्था/व्यवस्थापनांनी अर्ज करणे :** या मार्गदर्शक तत्त्वांनुसार महाविद्यालये/उच्च शैक्षणिक संस्थांचे इच्छुक व्यवस्थापने त्यांच्या महाविद्यालयांचे समूह विद्यापीठांमध्ये रूपांतर करण्यासाठी शासनाकडे अर्ज करतील.

**(ii) तपशीलवार प्रकल्प अहवाल (डिपीआर) :** स्वारस्य असलेले शैक्षणिक संस्था/व्यवस्थापन या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये आवश्यक असलेल्या सर्व तपशीलांचा समावेश असलेला तपशीलवार प्रकल्प अहवाल सादर करतील.

**(iii) प्रस्तावाची छाननी :** प्राप्त झालेल्या डीपीआरची छाननी करण्यासाठी राज्यशासनाद्वारे एक समिती नियुक्त केली जाईल. छाननीमध्ये आवश्यकतेनुसार सहभागी महाविद्यालयांना प्रत्यक्ष भेटींचा समावेश असू शकतो.

**(iv) शिफारस आणि मान्यता :** समिती आवश्यक तपशील आणि स्पष्टीकरण मिळविण्यासाठी प्रश्न उपस्थित करू शकेल, त्याचे स्पष्टीकरण मिळवेल आणि **त्यानंतर, प्रकरणनिहाय प्रस्तावांबद्दल आपल्या शिफारसी सादर करेल. राज्य मंत्रीमंडळ व विधानमंडळाच्या मान्यतेनंतर विद्यापीठ स्थापनेबाबतची अधिसूचना प्रसिद्ध करण्यात येईल.**

(३) समूह विद्यापीठे तयार करताना त्याकालावधीत संबंधित प्रमुख महाविद्यालय आणि घटक महाविद्यालयांमध्ये शिक्षण घेत असलेले विद्यार्थी त्यांचे पदवी/पदव्युत्तर अभ्यासक्रम पूर्ण होईपर्यंत त्या महाविद्यालयांच्या मूळ विद्यापीठांशीच संलग्नित राहतील.

(४) **समूह विद्यापीठामध्ये समाविष्ट होणाऱ्या अनुदानित महाविद्यालयासाठीचे अनुदान विद्यापीठ स्थापन होण्याच्या दिनांकापर्यंत त्यांना मंजूर असलेल्या अनुदानित**

## *महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ प्रभावीपणे लागू करणेबाबत...*

प्रति,

मा.राज्य सेवा हक्क आयुक्त, पुणे महसुली विभाग, पुणे-४११००५

crtspune@maharashtra.gov.in

**विषय :** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर; विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण कोल्हापूर व शिवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील सर्व अनुदानित महाविद्यलयांना **महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ प्रभावीपणे लागू करून अंमलबजावणी करणेबाबत...**

महोदय,

महाराष्ट्र राज्यामध्ये नागरिकांना सेवेचा हक्क देणारा क्रांतिकारी कायदा म्हणजे महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५. या कायद्यान्वये राज्याच्या नागरिकांना पारदर्शक, गतिमान व कालबद्ध सेवा मिळण्याचा अधिकार प्राप्त झाला आहे. **या कायद्याची काटेकोर अंमलबजावणी सुनिश्चित करण्याकरता महाराष्ट्र लोकसेवा हक्क आयोगाची स्थापना झाली आहे.**

हा कायदा पारित होऊन जवळ जवळ ७ वर्षे पूर्ण होऊन गेली. तरीही **शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण कोल्हापूर व शिवाजी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील सर्व अनुदानित महाविद्यालयांमध्ये या कायद्याची प्रभावीपणे अंमलबजावणी केली जात नाही.** त्यामुळे शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व नागरिकांना योग्य वेळी न्याय मिळत नाही. तसेच या कायद्याची अंमलबजावणी न केल्यामुळे पारदर्शक, गतिमान व कालबद्ध सेवा सुद्धा या कार्यालयांकडून मिळत नाहीत. अनेक प्रकरणांमध्ये फाईल दाखल केल्यानंतर त्यावर कधी निर्णय घेणार हे सुद्धा सांगितले जात नाही. तसेच सेवा हमी कायद्याच्या कलम ५ प्रमाणे अर्जाची पोहोच सुद्धा दिली जात नाही.

शिवाजी विद्यापीठाच्या व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, कोल्हापूर यांच्या कार्यक्षेत्रातील एकाही महाविद्यालयामध्ये सेवा हमी कायद्याची अंमलबजावणी होत नाही.

आपणास विनंती आहे की, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर; विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण कार्यालय, राजाराम कॉलेज परिसर, कोल्हापूर यांना व त्यांच्या अंतर्गत येणाऱ्या सांगली, सातारा व कोल्हापूर जिल्ह्यातील सर्व अनुदानित महाविद्यालयांना **सेवा हमी कायद्याची काटेकोर अंमलबजावणी करण्यासाठी आपणाकडून आदेश व्हावेत ही नम्र विनंती.**

कळावे,

**३१.०८.२०२३** आ.विश्वासू,

**(प्रा.डॉ.आर.के.चव्हाण)**

Ravvindra Chavvan<rkchavan2007@gmail.com>

## *राज्य लोकसेवा हक्क आयोग, पुणे विभाग, पुणे*

कार्यालयाचा पत्ता : ३ रा मजला, छत्रपती शिवाजीनगर घोले रोड,
क्षेत्रिय कार्यालय, पुणे म.न.पा.शिवाजीनगर, पुणे-४११००४
दुरध्वनी क्रमांक : ०२०-२९९५०६६३ ई-मेल : crtspune@maharashtra.gov.in
क्र.तक्रार-२०२३/प्र.क्र.१५२/सातारा/रासेहआपु/कार्या-१/४३०

**दिनांक : २७ सप्टेंबर २०२३**

प्रति,

उप कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

**विषय :** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर; विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण कोल्हापूर व शिवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील सर्व अनुदानित महाविद्यलयांना महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ प्रभावीपणे लागू करणेबाबत...

**संदर्भ :** प्रा.डॉ.आर.के.चव्हाण, ११७, शुक्रवार पेठ, ता.सातारा, जि.सातारा यांचा दि. ३१.०८.२०२३ रोजीचा ईमेल संदेश.

उपरोक्त संदर्भाधीन प्रा.आर.के.चव्हाण यांच्या विषयांकित प्रकरणाबाबतचा ईमेल संदेश या कार्यालयास प्राप्त झाला आहे. शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर; विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, कोल्हापूर व शिवाजी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील सर्व अनुदानित महाविद्यालयांमध्ये महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ ची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्याबाबत उक्त ईमेल संदेशान्वये तक्रार केली आहे. सदर अर्जाची प्रत सोबत जोडण्यात येत आहे.

**सदर तक्रारीच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ अंतर्गत अधिसूचित केलेल्या सेवा नियत कालमर्यादित पुरविण्याबाबत आवश्यक ती खबरदारी घेण्यात यावी,** तसेच या कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सर्व संबंधितांना आपल्या स्तरावरून आवश्यक त्या सूचना देण्यात याव्यात. अधिसूचित सेवेसंदर्भात आयोगाकडे तृतीय अपील दाखल झाल्यास कायद्यातील तरतुदीनुसार कसुरदार अधिकाऱ्यांवर दंडात्मक व शिस्तभंगविषयक कारवाई होवू शकते, याची नोंद घ्यावी. तसेच या कायद्याची काटेकोरपणे अंमलबजावणी होणेकरिता आवश्यकत ती दक्षता घ्यावी.

**तसेच महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ अंतर्गत अधिसूचित केलेल्या सेवा आपल्या विद्यापीठाशी संलग्न अनुदानित/विनाअनुदानित महाविद्यालयांमार्फत दिल्यात जातात किंवा कसे? याबाबत तात्काळ आयोगास खुलासा सादर करावा. तसेच या सेवा दिल्या जात असल्यास त्यासंबंधी पदनिर्देशित अधिकारी, प्रथम अपिलीय अधिकारी, द्वितीय अपिलीय अधिकारी यांचा तपशील आयोगास सादर करावा.**

**सोबत :** वरीलप्रमाणे.

**(अनुराधा खानविलकर), उप सचिव**
राज्य लोकसेवा हक्क आयोग, पुणे महसूली विभाग, पुणे

**प्रत :** प्रा.डॉ.आर.के.चव्हाण, ११७, शुक्रवार पेठ, ता.सातारा, जि.सातारा

**शिक्षक शिक्षकेतर पदांसह पुढे सुरू राहील.**

**(५) समूह विद्यापीठाचे विघटन :**

**(i)** पालक मंडळ, विद्यापीठाच्या कर्मचाऱ्यांना आणि विद्यापीठातील विद्यार्थ्यांना आणि शासनाला किमान एक वर्ष अगोदर पुरेशा कारणांसह नोटीस देऊन विद्यापीठ विसर्जित करू शकते.

**(ii)** विद्यमान विद्यापीठाने कायद्यातील कोणत्याही तरतुदींचे किंवा तेथे केलेल्या नियमांचे, कायद्याचे किंवा अध्यादेशांचे उल्लंघन केले आहे किंवा अधिनियम किंवा अधिसूचनेद्वारे जारी केलेल्या कोणत्याही निर्देशांचे उल्लंघन केले आहे, असे राज्यशासनाला दिसून आल्यास किंवा प्रस्तावित विद्यापीठात कोणतेही उपक्रम राबविणे बंद केले असल्यास, **प्रस्तावित विद्यापीठात आर्थिक गैरव्यवस्थापन किंवा गैर-प्रशासनाची परिस्थिती उद्भवली असेल, तर ते प्रस्तावित विद्यापीठाला पंचेचाळीस दिवसांच्या आत कारणे दाखविण्याची आवश्यकता असलेली नोटीस जारी करू शकते.**

**(iii)** विसर्जनाच्या बाबतीत, राज्यशासन, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांसह इतर कोणाच्याही आर्थिक, गैर-आर्थिक आणि शैक्षणिक **स्वरूपाच्या थकित दायित्वांचे तसेच प्राधिकरणाने अनुपालन न केल्यास शैक्षणिक संस्था नुकसान भरपाई देण्यास वचनबद्ध असल्यास शैक्षणिक संस्थेकडून अशी** नुकसान भरपाई वसूल करण्याच्या अनुषंगाने मूल्यांकन आणि पडताळणी करेल. अशा मूल्यांकन आणि निश्चितीच्या प्रक्रियेत शैक्षणिक संस्थेला प्रतिनिधित्व करण्याचा अधिकार असेल.

**(iv)** नियमित अभ्यासक्रमांच्या शेवटच्या तुकडीच्या विद्यार्थ्यांनी त्यांचे अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर आणि त्यांना पदविका, पदविका किंवा पुरस्कार प्रदान केल्यानंतरच विद्यापीठाचे विसर्जन लागू होईल.

**(v)** विसर्जनानंतर, समूह विद्यापीठाचे प्रमुख महाविद्यालय आणि सहभागी घटक महाविद्यालये राज्यशासनाच्या पूर्वपरवानगीने मूळ विद्यापीठाशी संलग्न होऊ शकतात.

**(६) वित्तीय सहाय्य :**

समूह विद्यापीठामध्ये समाविष्ट होणाऱ्या अनुदानित महाविद्यालयांसाठी मंजूर अनुदानित पदांचे वेतन व वेतनेतर खर्चाचे दायित्व सद्यस्थितीत राज्यशासनावर आहे. **सदर महाविद्यालयांचे अनुदान विद्यापीठ स्थापन होण्याच्या दिनांकापर्यंत त्यांना मंजूर असलेल्या शिक्षक शिक्षकेतर पदांसह पुढे सुरू राहील.**

विद्यापीठाचे कामकाज सुयोग्यरितीने चालण्यासाठी खाली नमूद केल्याप्रमाणे सांविधिक पदे निर्माण करण्यात येतील.

| अ.क्र. | पदनाम |
|---|---|
| १ | कुलगुरू |
| २ | कुलसचिव |
| ३ | संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ |
| ४ | संचालक, माहिती स्रोत केंद्र |
| ५ | संचालक, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळ |
| ६ | संचालक, विद्यार्थी विकास |
| ७ | वित्त व लेखा अधिकारी |

**उपरोक्त सांविधिक पदांच्या वेतनासाठी तसेच विद्यापीठाचा प्रशासकीय खर्च भागविण्यासाठी राज्यशासनाकडून दरवर्षी रु. १.०० कोटी (रुपये एक कोटी) इतकी ठोक तरतूद पहिल्या ५ वर्षासाठी विद्यापीठाला देण्यात येईल. याव्यतिरिक्त होणारा अतिरिक्त व इतर सर्व प्रकारचा खर्च विद्यापीठाने त्यांच्या विद्यापीठ निधीतून भागविणे अपेक्षित आहे. तसेच ५ वर्षांमध्ये विद्यापीठाने आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण होऊन त्यानंतर यावरील संपूर्ण खर्च विद्यापीठ निधीतून भागविणे अपेक्षित आहे.**

सदर शासन निर्णय नियोजन विभाग व वित्त विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२३११२९१७३९०६९९०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(अ.म.बाविस्कर)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

*****

**IN THE HIGH COURT OF JUDICATURE AT BOMBAY**

CIVIL APPELLATE JURISDICTION

## WRIT PETITION NO.8796 OF 2022

Radhika Nandkishor Mote **....Petitioner** Vs. The State of Maharashtra & Ors**.....Respondents** • Mr. C.G. Gavnekar a/w. Mr. Ashutosh Gavnekar & Mr. Rohit Parab, for the Petitioner. • Mr. N.C. Walimbe, AGP for the Respondent-State. • Mr. Chetan G. Patil, for Respondent Nos.5 and 6.

**CORAM**
**SUNIL B. SHUKRE &**
**FIRDOSH P. POONIWALLA, JJ**
**DATE : 3rd OCTOBER, 2023**
**ORAL JUDGMENT : Per : Sunil B. Shukre, J.**

**1.** Heard. Rule. Rule is made returnable forthwith, by consent of learned counsel for the parties.

**2.** Mr. Gavnekar, learned Senior Counsel for the petitioner submits that facts of the present case in their material particulars are identical to the facts in the case of *Shri Ashok Laxman Sasthe & Ors. Vs. State of Maharashtra & Ors., Writ Petition No.1669 of 2014, decided on 25th February, 2019,* and therefore, **this petitioner would also be entitled for consideration of her service rendered as Part Time Teacher for pensionary benefits** by applying Rule 57 of the Maharashtra Civil Services (Pension) Rules, 1982 (hereinafter referred to the Rules, 1982).

**3.** Learned AGP submits that even though the facts insofaras they relate to service rendered by the petitioner as Part Time Teacher are concerned, there is no doubt about them being same, **but what is important to know in the present case is the date on which the post the petitioner was rendering her service as Part Time Teacher became an aided post.** He points out from the record that this date is of 05.07.1994. **Therefore, according to the learned AGP, the petitioner should not be entitled to receive any benefits under Rule 57 of the Rules, 1982.**

**4. We are not inclined to accept the argument of learned AGP for the State for the reason that the question of pension** or the reason being aided or not aided is not relevant for the purpose of calculating the partial service rendered by the Teacher, with a view to make a discrimination about eligibility of pensionary benefits in terms of Rule 57 of the Rules, 1982, **and therefore, the argument is rejected.** Otherwise, as stated earlier, facts of this case are similar to those involved in the case of Ashok Laxman Sasthe (supra), which itself relies upon the view taken by this Court in the case of *Jyoti Prakash Chougule Vs. State of Maharashtra & Ors., in Writ Petition No.2354 of 2012.* **That being so, this petition deserves to be allowed and we do so.**

**5. We direct that the continuous part time service as a Teacher rendered by the petitioner shall be counted for the purpose of pension** in terms of Rule 57 of the Rules, 1982 in particular Note 1 thereof, and **accordingly, pensionary benefits shall be made available to the petitioner within a period of twelve weeks from the date of receipt of this order.**

**6.** We also direct the respondents to transfer the amount contributed by the petitioner from DCPS scheme to Provident Fund Account (PF) within a period of twelve weeks from the date of receipt of this order.

7. Rule is made absolute in the above terms.

8. Writ Petition is disposed of accordingly.

**[SUNIL B. SHUKRE, J.]**
**[FIRDOSH P. POONIWALLA, J.]**

*श्री.मधुकर भाऊरावती ठाकरे, सेवानिवृत्त वरिष्ठ लिपीक यांना सेवानिवृत्ती विषयक लाभ मिळण्यास झालेल्या विलंबाच्या कालावधीकरीता त्यांना प्रदान करण्यात आलेल्या रकमेवर व्याज अदा करण्याबाबत.*

# महाराष्ट्र शासन : कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग,

शासन आदेश क्रमांक : लोआप्र-२०२३/प्र.क्र.१६८/व्यशि-१ : मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
२ रा मजला, मंत्रालय (मुख्य इमारत), मुंबई-४०००३२

**दिनांक : २६ सप्टेंबर, २०२३**

**वाचा :** (१) वित्त विभाग, शासन अधिसूचना, दि. ०१.११.२००८ (२) वित्त विभाग, शासन निर्णय क्र. सेनिवे-१०९१/५५/सेवा-४, दि.०६.०५.१९९१ (३) वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक : अरजा २४९६/२०/सेवा-९, दि.२० जून, १९९६ (४) वित्त विभाग, शासन निर्णय क्र. वेपुर-३०९४/प्र.क्र.९३/सेवा-१०, दि. २२.११.१९९४ (५) वित्त विभाग, शासन शुद्धीपत्रक क्र. वेपुर-३०९४/प्र.क्र.९३/सेवा-१०, दि. २१.०३.१९९५ (६) वित्त विभाग, शासन शुद्धीपत्रक क्र.वेपुर-३०९४/प्र.क्र.९३/सेवा-१०, दि. २४.०१.१९९६ (७) विभाग शासन निर्णय क्र. गवियो-१००८/प्र.क्र.३१/२००८/शासन हमी, दि. ३०.०९.२००८ (५) संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्र.व्यशिप्र-२०२३/आस्था-४/प्र.क्र.५४/लोकआयुक्त/का-४, दि. २७.०४.२०२३

## *शासन आदेश*

श्री.मधुकर भाऊरावजी ठाकरे, वरिष्ठ लिपीक, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, शेगाव, जि.बुलढाणा हे शासकीय सेवेतून दि. १९.०८.२०१९ रोजी स्वेच्छेने सेवानिवृत्त झाले आहेत. श्री.मधुकर भाऊरावजी ठाकरे, यांनी मा.लोकआयुक्त यांचेकडे सेवानिवृत्ती वेतन व त्यानुषंगाने देय इतर लाभ मिळण्यास विलंब होत असल्याबाबत तक्रार केलेली होती. मा.लोकआयुक्त यांनी श्री.ठाकरे यांना सेवानिवृत्तीनंतर देय होणारे लाभ मिळण्यास विलंब झाला असल्याने सेवानिवृत्ती नंतर देय होणारे लाभाच्या रकमेवर ८ टक्के दराने व्याजाची परिगणना करून रक्कम अदा करण्याबाबत आदेश दिले होते. त्याअनुषंगाने श्री.ठाकरे यांना सेवानिवृत्तीनंतर देय रकमा अदा करण्यास झालेल्या विलंबाकरीता प्रदान केलेल्या रकमेवर ८ टक्के व्याजाने एकूण रु. २,००,२०१/- इतक्या रकमेस प्रशासकीय मान्यता देण्याची विनंती संचालनालयाने दि. २७.०४.२०२३ रोजीच्या पत्रान्वये शासनास केली आहे.

२. श्री.ठाकरे यांना सेवानिवृत्ती विषयक लाभ अदा करण्यास झालेल्या विलंबामुळे प्रदान करण्यात आलेल्या रकमेवर ८ टक्के व्याजदराने खालील विवरणपत्रात नमूद केल्याप्रमाणे एकूण रक्कम रु.२,००,२०१/- अदा करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | विवरण | प्रदान केलेली रक्कम | स्वेच्छा सेवानिवृत्ती नंतर ६ महिन्याचे आत देय दिनांक | रक्कम प्रत्यक्षात प्रदान केल्याचा दिनांक | विलंबाने प्रदान झाल्याने ८ टक्के दराने देय होणारी रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मृत्यू नि-सेवाउपदान | ६,१८,७५०/- | १९.०२.२०२० | १८.०२.२०२२ | ९९,०००/- | |
| २ | रजारोखीकरण | ४,३८,७५०/- | १९.०२.२०२० | ०१.११.२०२१ | ५९,६४३/- | |
| ३ | सातवा वेतन आयोगानुसार मिळणारा पहिला हप्ता | ३२,९०१/- | १९.०२.२०२० | १३.०३.२०२२ | ५,४३५/- | |
| ४ | सातवा वेतन आयोगानुसार मिळणारा दुसरा हप्ता | ३२,९०१/- | ०१.०७.२०२० | १३.०३.२०२२ | ४,४७९/- | वित्त विभाग शा.नि.दि. ३०.०६.२०२१ नुसार व्याजाची परिगणना |
| ५ | गटविमा योजना | ६१,६०६/- | १९.०२.२०२० | २०.०६.२०२२ | ११,५०९/- | |
| ६ | निवृत्ती वेतन | ४,९१,८८६/- | १९.०२.२०२० | ०२.०१.२०२२ | २०,०३६/- | |
| | **एकूण** | **१६,७६,७९४/-** | | | **२,००,१०२** | |

३. श्री.ठाकरे यांना सेवानिवृत्तीनंतर देय रकमा अदा करण्यास झालेल्या विलंबाकरीता प्रदान केलेल्या रकमेवर ८ टक्के व्याजाने देय होणारा खर्च खालील लेखाशिर्षातून भागविण्यात येईल.

(१) मृत्यू-नि-सेवा उपदान-मागणी क्र. G-६, २०७१०४१७-DCRG, ०४-Pensionary Charges, १२-Interest on Delayed payment.

(२) निवृत्ती वेतन - मागणी क्र. G-६, २०७१०१०३-Pension, ०४-Pensionary Charges, १२-Interest on Delayed payment.

(३) रजारोखीकरण - मागणी क्र. G-६, २०७१०५९८-११५ Leave Encashment Benefits, ०४-Pensionary Charges, १२-Interest on Delayed payment.

(४) गट विमा योजना - लेखाशिर्ष ८०११००५९ - General Insurance Saving Fund.

(५) ७ व्या आयोगानुसार मिळणारा पहिला व दुसरा हप्ता यांच्या व्याजावरील खर्च श्री.ठाकरे यांचे वेतन ज्या लेखाशिर्षाखाली आहरीत करण्यात येत होते त्याच लेखाशिर्षामधून भागविण्यात येईल.

४. सदर शासन आदेश वित्त विभागाच्या अनौ.संदर्भ क्र. १८०/सेवा-७, दिनांक ०२.०६.२०२३, अनौ. संदर्भ क्र.१३८/सेवा-६, दि. १४.०६.२०२३ व अनौ.संदर्भ क्र. २७३/सेवा-९, दि. १८.०७.२०२३ अन्वये प्राप्त सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन आदेश, महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संकेतांक क्र. २०२३०९२६१६३६०४७३०३ असा आहे. सदर आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(प्रदीप सा.शिवतरे)**
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

**NUTA BULLETIN** (Official Journal of NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION) **EDITOR :** Prof. Vivek S. Deshmukh, Balaji Society, Yavatmal 445 001. **PUBLISHER :** Dr. Prakash Tayade , 55, "Aai" Dr. Punjabrao Deshmukh Colony, Near V.M.V. Campus, Amravati 444 604 Published at NUTA Bulletin Office, Shikshak Bhavan, Sant Gadge Baba Amravati University Campus, **Amravati- 444 602. PRINTED AT** Bokey Printers, Gandhi Nagar, Amravati. (M.S) **REGD NO**. MAHBIL/2001/4448 Postal Registration No. AMT/RNP/78/2024-26 (Uploaded on www.nuta.in on 23.12.2023) Price : Rs. Five / Name of the Posting office : **R.M.S. Amravati.** Date of Posting **: 01.01.2024**

**If Undelivered , please return to :** NUTA Bulletin Office, Shikshak Bhavan, Sant Gadge Baba Amravati University Campus, **Amravati- 444 602.**

---------------------------------------------------

To,........................................................................

...............................................................................

...............................................................................

...............................................................................